आय. एस्. ओ. ९००१: २०१५ मानांकित महाविद्यालय

संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, महागांव

शब्दवेध

वृत्तपत्र

आवृत्ती - ४
जानेवारी २०१९ ते मे २०१९



संपादकीय मंडळ

डॉ. श्री बिमलेशकुमार	प्राचार्य
श्री. पी. एम. पालकर	प्रशासक
श्री. ए. ए. देशपांडे	संपादक
श्री. व्ही. ए. पाटील	सदस्य
श्री. एस. ए. चौगुले	सदस्य
कु. ए. पी. नारायणकर	सदस्या
श्री. बी.बी रेपे	सदस्य
सौ. एन. आर. देसाई	सदस्या
श्री. आर. पी. भालेकर	सदस्य

८४ व्या वर्षात
ॲड आण्णासाहेब चव्हाण
यांचे पदार्पण


२३ जून
८३ वा वाढदिवस
हा गौरव सामाजिक कर्तृत्वाचा राजकीय कुशलतेचा, वैद्यकीय सेवेचा, सहकार, अनु शिक्षण समृद्धीचा..
ॲड. आण्णासाहेब चव्हाण
शुभेच्छुक :
सर्व प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,
संत गजानन महाराज शिक्षण समूह, महागाव.
ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.

भरारी डिजिटल सर्व्हीसेस(BDS)

संत गजानन महाराज शिक्षण समुह महागावं ता. गडहिंग्लज यांचे मार्फत भरारी डिजिटल सर्व्हीसेस कंपनी चालविली जाते त्यानिमित्त...संत गजानन शिक्षण समुह शैक्षणिक क्षेत्रातील एक अग्रगण्य समूह म्हणून नावारुपाला आलेला आहे. या समुहाने मेडिकल, इंजिनिअरिंग, इंग्लिश माध्यम शाळा, मराठी माध्यम शाळा, डी.एड्, बी.एड् अशी अनेक दालने उघडून शिक्षणाची ग्रामीण भागात सोय केली आहे. याचे सर्वेसर्वा संस्थापक अध्यक्ष मा.ॲड.डॉ अण्णासाहेब चव्हाण हे आहेत. यामध्येच एका नवीन दालनाची भर पडले ते म्हणजे रोजगार निर्मितीसाठी पोषक असे भरारी डिजिटल सर्व्हिसेस होय. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती व्हावी व घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग व्हावा या उद्देशाने भरारी डिजिटलची संकल्पना पूर्णत्वास आली. यापूर्वी अशा सर्व्हिसेस फक्त मुंबई, नागपूर, बेंगलोर, चेन्नई, हैद्राबाद या ठिकाणी होत्या. पण रोजगाराची कमतरता लक्षात घेवून सध्या अशा कंपन्या कोल्हापूर, नाशिक, पूणे, इ. शहरात आपले नेटवर्क तयार करत आहेत. संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातएकमेव असेठिकाण म्हणजे संत गजानन महाराज इंजिनिअरिंग कॉलेज, साईट चिंचेवाडी या ठिकाणी सध्या ग्रामीण भागातील इंजिनिअरिंग, फार्मसी व डॉक्टर पदवी घेतलेले तरुण संयुक्तपणे आपले कौशल्य वापरुन काम करत आहेत.भरारी डिजिटल सर्व्हिसेस कंपनी ही बॉम्बे बेसूड रजिस्टर कंपनी आहे. ही कंपनी आरोग्य व त्याविषयी निगडीत क्षेत्रात काम करते. यामध्ये कॅनडा, ऑस्ट्रेलिया, दुबई येथील नामवंत कंपन्यांचा सहभाग आहे.परदेशामध्ये दररोज अनेक दुर्मिळ व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. तसेच अनेक आजारांवर नवनवीन संशोधन करुन औषधे तयार केली जातात अशा वेळी तेथील तंत्रज्ञान संबंधी माहितीची देवाण घेवाण व त्यांचे विश्लेशन(Data Analysis and extraction) संकलन केले जाते. तसेच परदेशातील चालू प्रयोगांचे फायदेतोटे यांचाही अभ्यास केला जातो. या सर्व व्यवस्था इंटरनेट व ऑनलाइन पध्दतीने राबविल्या जातात.BPO आणि KPO म्हणजेच Business process outcomes आणि Knowledge process outcomes यांच्या धर्तीवर काम चालते. संपूर्ण भारतात दक्षिण भारतात अशा कंपन्या कार्यरत आहेत. त्यापैकी KPO ही महाराष्ट्रात फक्त संत गजानन शिक्षण समूहात कार्यरत आहे. यामध्ये सध्या 40 तरुणतरुणींना रोजगार उपलब्ध झालेला आहे. भविष्यामध्ये अजून एक हजार रोजगार उपलब्ध होईल. तसेच सध्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये असणाया सोई व सुविधा उपयोगात आणून एक प्रशस्त प्रयोगशाळा, अत्याधुनिक संगणक प्रणालीने कार्यन्वीत केलेली आहे. यामध्ये सीसीटीव्ही, स्वतंत्र सर्व्हर, राऊटर, अत्याधुनिक पध्दतीच पन्नास कॉम्प्यूटर, बँकअपची सोय आहे. याठिकाणी गोपनियता म्हणून माहिती संकलन अत्यंत जबाबदारीने केले जाते. सध्या एका प्रोजेक्टरवर काम चालू असून भविष्यात आणखी पाच प्रोजेक्ट मिळतील याची ग्वाही आहे. जर सलग तीन वर्षे येथील गुणवत्ता कायम ठेवली तर भविष्यात येथील तरुणतरुणींना जगभरातून ekx.kh निर्माण होईल. त्यामूळे जगातील संशोधन ग्रामीण विद्यार्थ्यांना आत्मसात करता येईल. या उपक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त डॉ. यशवंत चव्हाण, डॉ. संजय चव्हाण यांचे मार्गदर्शन वेळोवेळी लाभत आहे. अशा पध्दतीने ग्रामीण भागातील युवक युवतींना रोजगार संधी उपलब्ध करुन संत गजानन महाराज शिक्षण समुहाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे..

शब्दांकन
प्रा. अतुल देशपांडे
मेकॅनिकल विभाग इंजिनिअरिंग

सर्जनशीलता असेल तरच संशोधनवृत्ती तयार होईल

– प्रा. डॉ. प्रतापसिंह देसाई

संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय व संत गजानन महाराज रुरल पॉलिटेक्नीक यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय परिशदेचे आयोजन करण्यात आले होते. रिसेन्ट टेन्डन्स इन सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी इंडियन सोसायटी फॉर टेक्नीकल एज्युकेशन न्यु दिल्ली चेअरमन प्रा. डॉ. प्रतापसिंह देसाई उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात परिषदेच्या ॲबस्ट्रॅक्ट बुक उदघाटनाने करण्यात आली. या वेळी प्राचार्य डॉ. बिमलेश कुमार यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी प्रा. देसाई बोलताना म्हणाले, सध्या अभियांत्रिकी क्षेत्र एका वेगळया वळणावर येऊन पोचले आहे. जगात एकशे दहा कोटी अभियांत्रिकींची गरज 2030 सालापर्यंत लागणार आहे. दरवर्षी भारतातून 17 लाख अभियंते बाहेर पडतात. जगातील एकूण अभियंत्यांच्या 30 टक्के अभियंते भारतीय आहेत. 2030 सालापर्यंत नवीन तंत्रज्ञानामुळे सर्व क्षेत्रात आमूलाग्र बदल होणार आहेत. विद्यार्थ्यांनी संशोधनवृत्ती अंगीकृत केली पाहीजे,तरच अभियांत्रिकी शिक्षणाचा उपयोग होणार आहे.या कार्यकमासाठी संत गजानन शिक्षणसमूहाचे विश्वस्त डॉ. संजय चव्हाण, डॉ. संजय दाभोळे प्राचार्य पॉलिटेक्नीक, डॉ. व्ही. डी. वैदय कोल्हापूर, प्रा. के. रवी, प्रा. राजेंन्द्र हेददूर, प्रा. ए. ए. माने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या दुसरया सत्रात परिषदेला अनुसरुन डॉ. प्रा. एस. एच. सावंत, जे. जे. मगदूम, जयसिंगपूर, प्रा. डॉ. व्ही. एच. जोशी आय. आय. टी. रुरकी, डॉ. एच. ए. दिनेशा जैन कॉलेज बेळगाव या मान्यवरांची तत्रंज्ञान विषयक व्याख्याने झाली. परिषदेच्या शेवटच्या सत्रात शोधनिबंधावर आधारित पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात होती. यावेळी डॉ. व्ही. एच. जोशी, डॉ. एच. ए. दिनेशा, प्रा. के. रवी यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. राष्ट्रीय परिषदेचे नियोजन डॉ. ए. ए. माने व प्रा. सौ आर. एस. पाटील यांनी केले होते. यावेळी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला. राष्ट्रीय परिषद पार पाडण्यासाठी ॲड. अण्णासाहेब चव्हाण, डॉ.संजय चव्हाण, डॉ. यशवंत चव्हाण, प्राचार्य डॉ. बिमलेश कुमार, प्राचार्य डॉ. संजय दाभोळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. पी. एम. पालकर यांनी सर्वांचे आभार मानले.

विद्यार्थ्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत ज्ञान घ्यावे

- प्रा. राजेंद्र ठाकूर

(महागावं) संत गजानन महाराज अभियांत्रीकी महाविद्यालयात १२ जानेवारी या युवकदिनी स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. जे.पी.नाईक महाविद्यालयाचे प्रा.राजेंद्र ठाकूर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ.बिमलेश कुमार होते. या प्रसंगी बोलतांना ते म्हणाले, " विद्यार्थ्यांनी विवेकानंद तसेच सावरकर यांचे विचार पूर्णपणे वाचून मग ते आचरणात आणावेत. युवकांनी प्रवाहाबरोबर न जाता प्रवाहाविरुध्द धाडसाने जाऊन आपले भविश्य घडवावे." कार्यक्रमाची सुरुवात विवेकानंदांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन झाली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्रा. अमर फराकटे यांनी केले. सुत्रसंचालन कु. पूनम खाडे यांनी केले. कार्यक्रमास प्रा.एस.टी.माटले, प्रा.संभाजी चव्हाण, प्रा.बी.बी.रेपे, प्रा.एस.आर.देसाई, प्रा.ए.ए.देशपांडे व इलेक्ट्रॉनिक्स विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

संत गजानन महाराज अभियांत्रिकीचे यश

महांगाव संत गजानन महाराज अभियांत्रिकी मधील कु प्रसाद रविकांत दळवी मेकॅनिकल विभाग यांची जारो एज्युकेशन, मुंबई या कंपनीमध्ये निवड झाली आहे. करिअर डेव्हलपमेंट एक्सीक्युटीव्ह म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्याला वार्षिक पॅकेज सहा लाख रुपये मिळाले आहे. निवड प्रकिया एकूण तीन फेरीमध्ये पार पडली. अंतिम फेरीमध्ये एकूण 50 विद्यार्थी निवड झाले होते. त्यामध्ये एस.जी.एम मधून एकमेव विद्यार्थ्याची निवड करण्यात आली होती. यामध्ये कोल्हापूर, सांगली, पूणे परिसरातील विद्यार्थी सहभागी झाले होते.सध्या तो मेकॅनिकल विभागात अंतिम वर्षात शिकत आहे या प्रसंगी संत गजानन महाराज शिक्षण समुहाचे विश्वस्त डॉ. संजय चव्हाण यांनी सत्कार केला. यावेळी प्राचार्य डॉ. बिमलेशकुमार, प्रा.डॉ.के.रवी, प्रा.राजेंद्र हेददूर, प्रा. एस आय जबडे, प्रा. व्ही.आर.घाटगे, प्रा.पी.एम.पालकर उपस्थित होते. विभागातील सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

राष्ट्रीय विज्ञानदिन साजरा

(महागावं) संत गजानन महाराज अभियांत्रीकी महाविद्यालयात 28फेब्रुवारी रोजी राश्ट्रीय विज्ञानदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रा.जे.ए.देसाई (सोसायटी मॅथेमेटीकल इंजिनिअरींग) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रथम वर्शातील विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन वैज्ञानिक उपकरणे सादरीकरणामध्ये सहभाग घेतला. सहभागी विद्यार्थ्यांना पारितोशिक देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमामध्ये प्रा.जे.ए.देसाई यांनी विद्यार्थ्यांसमोर मॅथेमेटिकल मॉडेलिंग इन इमेज प्रोसेसिंग या संदर्भातील माहिती विशद केली. डॉ.सी.व्ही.रमण व त्यांच्या वैज्ञानिक कार्याचा आढावा घेणारी चित्रफीत दाखवण्यात आली. विभागप्रमुख डॉ.अमोल माने, यांनी "रामन इफेक्ट"बद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, प्रा.पी.एम.पालकर, प्रा.पी.एस.चिंदी उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रा.एस.बी.पोवार यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन ग्रंथालयात करण्यात आले होते. या प्रसंगी ग्रंथपाल संभाजी चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

Vision

To meet the aspirations of the global community through sustainable quality education and interdisciplinary research with innovative changing technologies.

Mission

- To be a major contributor in nation building through collaborative efforts from academia and adminstritavia activities.
- To achieve academic excellence and overall developments of the students, staff through lifelong learning leadership and ethical guidelines for productive career.
- To apply innovative ideas, career oreined education toward achieving the best possible outcome from rural to global.
- To enrich engineer to respond competently and confidently to the arising economic, socialand industrial challenges.
- To aware the society to adopt the innovation for improvement of health,life-style in an eco- friendly manner.

Objective

- To enhance quality technical education facilities for overall personality development of the students.
- Strengthen and consulate industry-institue interaction to inculcate best enginnering practices for better employment opportunities.
- To encourage research spirit by organizing quality improvement program like workshop, project expo, seminar, conference.
- To strenghen competitiveness in the students by national / international entrepreneurshiop, industrial project opportuniites.

Published by - SGMCOE
Publication Date - 24/06/2019

प्राचार्य मनोगत

शब्दवेधच्या अंकाची चौथी आवृत्ती प्रकाशित करतांना मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयाने गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्यात सामाजिक मूल्ये रुजविण्याचा सतत प्रयत्न केला आहे. संपूर्ण महाविद्यालयात घेणाऱ्या विविध प्रभागातील घटनांचा आरसा म्हणजे शब्दवेध आहे. गुणवत्तेच्या बाबतीत महाविद्यालय एकएक शिखर पादाक्रांत करीत निघाले आहे. विद्यार्थ्यांच्या सत्तगुणांना वाव देण्याचा एक प्रयत्न केला असून त्यामध्ये भरघोस प्रतिसाद मिळालेला आहे. त्याचबरोबर इतरही क्षेत्रात नावलौकीक मिळविण्याचा आणि टिकविण्याचा सतत प्रयत्न सुरु आहे. शब्दवेधसाठी संपादक मंडळातील सर्व सदस्यांचे अभिनंदन...

प्राचार्यपदी रुजूझाल्यानंतर माझ्या तीन वर्षीय कालावधीमध्ये महाविद्यालयातील शैक्षणिक, सामाजिक सांस्कृतीक घडामोडींचा आढावा घेण्याचेकार्य शब्दवेधने केले आहे. एक बहुअंगीव्यासपीठ म्हणून शब्दवेधचा मला जाणीवपूर्वक उल्लेख करावा असा वाटतो. महाविद्यालयात होणाऱ्या प्रगतीपुरक कार्यक्रमांची माहिती आम्ही शब्दवेधद्वारे सर्वांपर्यंत पोहचवू शकलो याचा आम्हांला सार्थ अभिमान वाटतो. विद्यार्थ्यांसाठी हे एक व्यासपीठ आहे. त्यांच्या सुप्तकलागुणांना व्यक्त होण्याचे एकमेव प्रभावीसाधन आहे. याचा मला सार्थ आनंद वाटतो. शब्दवेध प्रकाशित होण्यासाठी संत गजानन शिक्षणसमूहाचे संस्थापक ॲड. आण्णासाहेब चव्हाण व समुहाचे इतर विश्वस्त यांचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन व सहकार्य आम्हांला प्रेरणादायी ठरत आहे.

प्राचार्य डॉ बिमलेश कुमार

संपादकीय

महाविद्यालयातील तरुण म्हणजे चैतन्याचे प्रतिक असते. त्यांना योग्य दिशा मिळाल्यास त्यांच्यातील सुप्तगुणांचा विकास फुलणाऱ्या फुलासारखा होतो. व त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळतो. मनाच्या गाभाऱ्यातून निर्माण होणारे सर्जनशीलतेचे अंकूर असतात. त्या अंकुरांना पल्लवीत करण्याचे काम 'शब्दवेध' मध्ये केले जाते. गुणवत्तेच्या बाबतीत शैक्षणीक, सामाजीक क्षेत्रात महाविद्यालयाने दिलेले भरीव योगदान या शब्दवेधद्वारे सर्वांपर्यंत पोहचवता येते. महाविद्यालयात घेणाऱ्या साहित्य, शिक्षण, कला, संस्कृती, क्रिडा, सेवा व सामाजीक क्षेत्रातील घटनांचा आढावा या शब्दवेधद्वारे घेण्यात आला आहे. शब्दवेधचा अंक प्रकाशित करण्यासाठी संत गजानन शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.आण्णासाहेब चव्हाण व विश्वस्त यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शब्दवेधच्या सर्व सदस्यांचेही सहकार्य लाभले.

प्रा अतुल देशपांडे

"झेप" कार्यक्रम उत्साहात संपन्न

"झेप तिच्या स्वप्नांची सन्मान तिच्या कर्तृत्वाचा" या वाक्याला साजेसा कार्यक्रम संत गजानन महाराज महाविद्यालयात संपन्न झाला. झेप कार्य क्रमार्तंगत परिसरातील कर्तृत्वान महिलांचा सत्कार करण्यात आला. या कार्यकमासाठी प्रमुख पाहूणे म्हणून सौ. रेखा पोतदार उपस्थित होत्या. त्यांनी महाविद्यालायातील महिला मार्गदर्शन केले. यावेळी सर्पमित्र कु. सनाम सनदी व गडहिंग्लज एस. टी. डेपोतील तांत्रिक विभागातकाम करणाऱ्या महिलासौ. अश्विनी तोरसे व सौ. नंदिनी तोरसे यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आले होते.

सूत्र संचालन एस. बी. पोवारतर आभार प्रदर्शन ए. ए. देशपांडे यांनी केले. या कार्यकमासाठी प्रा. एस. एस. राजाराम, प्रा. ए. पी. नारायणकर, प्रा. पी.आर. गड्डयानावर, प्रा. एन. एच. नेत्रावती , सौ. रुपम सिन्हा उपस्थित होत्या.

संत गजानन अभियांत्रीकी उपविजेते

संत गजानन अभियांत्रीकीमधील खो-खो.संघास उपविजेतेपद मिळाले. इंचलकरजी येथे या स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेमध्ये भारती विद्यापिठ संघास पराभूत करुन अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत डे. के. टी. ई. बरोबर झालेल्या सामन्यात निसटता पराभव झाला. त्यामुळे संत गजाननच्या खो-खो संघास उपविजेतेपद मिळाले. हया स्पर्धा लिड-कॉलेज अंतर्गत घेण्यात आल्या होत्या. खो-खो संघास संघ व्यवस्थापक प्रा. संगमेश तंबरीमठ यांचे मार्गदर्शन लाभले. विजेत्या संघाचे अभिनंदन अध्यक्ष ॲड. आण्णासाहेब चव्हाण, डॉ. यशवंत चव्हाण, डॉ. संजय चव्हाण यांनी केले. या प्रसंगी डॉ. बिमलेश कुमार, प्रा.पी.एम.पालकर व सर्व विभागप्रमुख यांचे विशेश सहकार्य लाभले.

संत गजानन अभियांत्रीकीमध्ये छ.शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी...

संत गजानन अभियांत्रीकी कॉलेजमध्ये छ.शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कॅम्पसमधुन भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी महाराजांची प्रतिमा सजवून पारंपारीक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी अश्वनृत्य सादर करण्यात आले. या प्रसंगी भारती विद्यापिठ अभियांत्रीकीचे प्रा. प्रविण राजीगरे यांचे प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी बोलतांना त्यांनी स्वराज्याचा खरा अर्थ, शिवाजी महाराजांचे कार्य व प्रेरणा, नेतृत्वगुण या विशयांवर मार्गदर्शन केले.

प्रा. राजीगरे यांचे स्वागत प्राचार्य डॉ. बिमलेश कुमार यांनी केले. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन प्रा.ए.ए.देशपांडे यांनी केले. या कार्यक्रमास सर्व विभागातील विद्यार्थी, प्रा.पी.एम.पालकर, श्री.रणजीत आरडे उपस्थित होते.

संत गजानन शिक्षण समुहामध्ये "पदवी दान समारंभ" संपन्न

संत गजानन महाराज शिक्षण समुहामध्ये अभियांत्रिकी व बी. फार्मसी महाविदयालयाच्या संयुक्त विदयमानाने पदवीदान समारंभ आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी डॉ. मधुकर बाचुळकर व डॉ. सतिश घाळी प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. बी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. जी. किल्लेदार यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळीडॉ. बाचुळकर बोलताना म्हणाले की फक्त विदयार्थ्यांनी पदवीवरच समाधान मानू नये. पदव्यूत्तर शिक्षणात प्रवेश घेऊन संशोधनावर भर दिला पाहिजे. यामध्ये ग्लोबलवार्मिंग व समस्या यावर संशोधन होणे गरजेचे आहे. कार्यक्रमांमध्ये फार्मसी व अभियांत्रिकीच्या पदवी संपादन केलेल्या विदयार्थ्यांना पदवी सन्मानपूर्वक देण्यात आल्या. डॉ. एस.एच. पाभोळे यांनी इंडस्ट्री 4.5 यावर विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. बिमलेशकुमार यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. स्वप्नील हराळे, प्रा. शिवलिंगस्वामी यांनी केले. यावेळी संत गजाननचे विश्वस्त डॉ. यशवंत चव्हाण, प्राचार्य डॉ. बिमलेशकुमार, प्रा. के. रवी, प्रा. आर. व्ही. बमनकट्टी, प्रा. अभिनंदन आलमान, प्रा. आर. बी. कुंभार सर्व फार्मसी व अभियांत्रिकी महाविदयालायाचे प्राध्यापक उपस्थित होते.

संत गजानन अभियांत्रीकीचे आठ विद्यार्थ्यांची निवड

महागावं, येथील संत गजानन महाराज अभियांत्रीकीचे एकूण आठ विद्यार्थी 'ग्रीट टेक्नॉलॉजी, बेंगलोर येथे निवड झालेले आहेत..यामध्ये कुमारी. स्मिता गुडाळे(कंम्प्युटर विभाग), कु. आदित्य सुतार , कु. अक्षय पतंगे, कु. चैतन्य कुलकर्णी, कु. आशिश पाटील, कु. प्रविण गणाचारी, कु. अक्षय पोवार, कु. आनंदा यमेटकर (सर्व मेकॅनिकल विभाग) यांचा समावेश आहे. सदर विद्यार्थ्यांना वार्शीक 1.8 लाखाचे पॅकेज मिळाले आहे. सर्व विद्यार्थी ग्रॅज्युएट अकांउट ट्रेनी म्हणून निवड झालेले आहेत. निवड प्रकिया बेळगावं येथे पार पडली. यामध्ये कोल्हापूर व बेळगावं परिसरातील अभियांत्रीकी कॉलेजचे विद्यार्थी सहभागी झालेले होते.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्राचार्य बिमलेश कुमार, ट्रेनींग व प्लेसमेंट अधिकारी डॉ. राजेंद्र हेद्दूर, प्राचार्य सिदगोंडा जबढे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष ॲड. आण्णासाहेब चव्हाण, डॉ. यशवंत चव्हाण, डॉ. संजय चव्हाण यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

संत गजानन अभियांत्रीकीचे कब्बड्डी स्पर्धेत यश

महागावं येथील संत गजानन महाराज अभियांत्रीकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कोल्हापूर येथील (साळुंखेनगर) येथे झालेल्या डॉ.डी.वाय.पाटील अभियांत्रीकी महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडलेल्या लीड कॉलेज अंतर्गत स्पर्धेत अजिंक्यपद मिळविले.या स्पर्धेत एकूण 5 विविध कॉलेजच्या संघानी सहभाग घेतला होता. अंतिम सामन्यात संत गजाननच्या संघाने डी.ओ्.टी.कोल्हापूर संघाचा 18.7 गुणाने पराभव केला व सामनाजिंकला. या संघाची पुढील महिन्यात होणाऱ्या झोनसाठी निवड झाली. या संघामध्ये एस.जी.एम मधील विविध विभागातील मुलांनी आपले प्राविण्य दाखविले. संघ व्यवस्थापक प्रा.संगमेश तंबुरीमठ यांचे मार्गदर्शन लाभले.विजेत्या संघाचे अभिनंदन अध्यक्ष ॲड. आण्णासाहेब चव्हाण, डॉ. यशवंत चव्हाण, डॉ. संजय चव्हाण यांनी केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. बिमलेश कुमार, प्रा.पी.एम.पालकर व सर्व विभागप्रमुख यांचे विशेश सहकार्य लाभले.

संत गजानन महाराज अभियांत्रिकीच्या 2017 18 बेटी बचाव अभियानास पूरस्कार

संत गजानन महाराज अभियांत्रिकीच्या साल 2017 18 च्या बेटी बचाव बेटी पढाव अभियानास बेस्ट परफॉर्मिंग कॉलेज ऑफ इयर हा पूरस्कार मिळाला. शिवाजी युनिर्व्हसिटी मध्ये या पूरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून सौ. प्रतिमा सतेज पाटील, तारा उस्मानखान यावेळी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे नियोजन विदयापीठात भाशा सभागृहात केले होते.

संतगजानन मध्ये या अभियानार्तंगतदोनपथनाट्य ग्रामीणभागात घेऊन जागृकता करण्यात आली. तसेच महिला दिनानिमित्त कार्यकमाचे आयोजित केला होता. तसेच कम्प्यूटर विभागातर्फे माईंड स्पार्क कार्यकमाचे आयोजन केले होते. यामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा घेऊन जागृकता करण्यात आली. या सर्व कार्यकमाचे नियोजन व प्रतिसाद पाहून हा पूरस्कार देण्यात आला.

या अभियान राबिवण्यासाठी प्रा. ए. पी. नारायणकर, प्रा. एस. एस. राजाराम, प्रा. डी. डी. पोवार, प्रा. एस.व्ही. कलस, प्रा.पी. आर. गड्डयानावर, प्रा. ए. ए. देशपांडे , प्रा. पी. एम. पालकर , यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. बिमलेशकुमार यांचे मार्गदर्शन लाभले.

नवप्रर्वत्य 2K19 उत्साहात साजरा

संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविदयालयामध्ये नवप्रर्वत्य 2K19 टेक्नीकल प्रोग्रॅम उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. एस. बी. पाटील, जे. जे.मगदूम कॉलेज जयसिंगपूर, व उदयोजक रमेशराव रेडेकर उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये एकूण पाच प्रकारात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये टॅलेंट हंट क्वीज, कौशल्य पेपर प्रेझेंटेशन, प्रोझील प्रोजेक्ट कॉम्पीटीशन, कॅड वॉर, लॅंड इन पोचिंकी पबजी मोबाईल यांचा समावेश होता. या स्पर्धेमध्ये बेळगाव, कोल्हापूर, सांगली, सांवतवाडी या परिसरातील अभियांत्रिकी महाविदयालयातील 450 विदयार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

या सर्व स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून प्रा. सुनिल कदम भारती विदयापीठ कोल्हापूर भावेश सिंग, प्रा. सुहास यादव, प्रा. धनाजी रेपे, श्री. धवल बाम्बवाडे, यांचे सहकार्य लाभले.

स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे

1 टॅलेंट हंट क्वीज – उपविजेता – स्वप्नील चव्हाण – **SGMCOE** विजेता – निरंजन मलकरी – **SGMCOE**

2 कौशल्य पेपर प्रेझेंटेशन – उपविजेता 1) सपना गायकवाड SIT यड्राव 2) आकाश कोश्टी PVPIT बुधगाव

विजेता उमेश हेब्बाले HIT निडसोशी

नॉन सर्कीट ग्रुप – उपविजेता – यशोदा बडगावी HIT निडसोशी विजेता – चाण्यक्य रुडगी SGMRP

कॅड वॉर ॲटोकॅड – उपविजेता – 1) प्रमोद शिंदे 2) अभिजित पाटील

विजेता – गुरुप्रसाद पाटील

लॅंड इन पोचिनकी पब जी मोबाईल – उपविजेता – 1) शुभम अरमागोळ SGM Pharmacy

विजेता – 2) अविनाश कामटे SGMCOE

प्रोझील प्रोजेक्ट कॉम्पीटीशन –

नॉन सर्कीट – उपविजेता – 1) अस्मिता पाटील SGMcivil 2) सुप्रिया खानापूरे SGMcivil

विजेता – 1) एम रामया SGPN Nidsoshi

दिपक देसाई SGPN Nidsoshi गुरुप्रसाद SGPN Nidsoshi

सर्कीट ग्रुप – उपविजेता अक्षय जाधव SGMCOE विजेता – रबिया हवाळे SGMCOE

सर्व विजेत्या व स्पर्धकांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. यावेळी संत गजाननचे शिक्षण समुहाचे विश्वस्त ॲड बाळासाहेब चव्हाण, डॉ. यशंवत चव्हाण, डोमेन कॅम्प्यूटरचे मा. एम. आर. पाटील, प्रा. सूहास यादव, डॉ. बिमलेश कुमार, प्रा. पी. एम. पालकर उपस्थित होते. आभार प्रदर्शन प्रा. ए. बी. फराकटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. एस. बी. पोवार यांनी केले. या सर्व स्पर्धांचे आयोजन महाविदयालयाच्या कॅम्पसमध्ये करण्यात आले होते. स्पर्धेचे नियोजन प्रा. आर. डी. घुळण्णावर यांनी केले. स्पर्धेसाठी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. स्पर्धेचे नियोजन व प्रतिसाद पाहून अध्यक्ष ॲड. अण्णासाहेब चव्हाण, डॉ. संजय चव्हाण यांनी समाधान व्यक्त केले.